जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
कार्यालय कोल्हापूर
5 FEB 2019
आवक क्रमांक :- १५८८

महाराष्ट्र शासन कृषि विभाग, कोल्हापूर
व
विभागीय विस्तार केंद्र, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर
-: कृषि संदेश :-
कालावधी – १ ते २८ फेब्रुवारी, २०१९

१) ऊस (पूर्वहंगामी, सुरू, खोडवा) :

१.१ पूर्वहंगामी :

१.१.१ १२ ते १६ आठवड्याच्या पूर्वहंगामी ऊसाला हेक्टरी ३४ किलो नत्राचा (७५ किलो युरिया) तिसरा हप्ता द्यावा.

१.१.२ पूर्वहंगामी ऊसाला भरणीच्या वेळी हेक्टरी १४० किलो नत्र (३१० किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३० किलो सिंगल सुपर फॉस्फेट), ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) देवून भरणीची कामे पूर्ण करावीत.

१.१.३ पूर्व हंगामी ऊसातील आंतरपिकाची अवस्था पाहून काढणी करावी.

१.२ सुरू :

१.२.१ सुरू ऊसाची लागण करावयाची असल्यास १५ फेब्रुवारी अखेर लागण पूर्ण करा.

१.२.२ ऊसाची लागण सलग सरीमध्ये दोन ओळीतील अंतर मध्यम जमिनीसाठी १००-१२० सें.मी., भारी जमिनीसाठी १२०-१५० सें.मी.ठेवून करावी किंवा ७५-१५०से.मी. किंवा ९०-१८० सें.मी. पट्टा पध्दतीने करावी.

१.२.३ लागणीसाठी को.एम.०२६५(फुले २६५),को.८६०३२(निरा),नवीन प्रसारित वाण एम.एस.१०००१,को.९४०१२(फुले सावित्री),कोसी ६७१ यावाणाची निवड करावी.लागणीसाठी दोन डोळ्याची टिपरीचा वापर करावा.

१.२.४ बेणेमळ्यातील चांगले निवडून घेतलेले बेणेच ऊस लागवडीसाठी वापरावे. खोडव्याचा ऊस लागणीसाठी वापरू नये.लागणीपुर्वी बिजप्रक्रियेसाठी ३०० मि.ली. मॅलॅथिऑन + १०० ग्रॅम बाविस्टीन (कार्बेन्डॅझिम)१००लीटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १० ते १५ मिनटे बुडवावे व नंतर ॲसिटोबॅक्टर व स्फुरद विरघविणारे जीवाणू अनुक्रमे १० किलो आणि १.२५ किलो १०० लीटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या पाण्यात बेणे टिपऱ्या ३० मिनटे बुडवून लागणीसाठी वापराव्यात. यामुळे नत्र खताची बचत होवून स्फुरद खताची उपलब्धता वाढते.

१.२.५ सुरू ऊसाच्या लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र,६० किलो स्फुरद,६० किलो पालाश द्यावे.तसेच सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास माती परीक्षणानुसार झिंक सल्फेट २० किलो,फेरस सल्फेट २५ किलो,मॅंग्नीज सल्फेट व बोरॅक्स ५ किलो प्रती हेक्टरी शेणखतात मिसळून सावलीत मुरवून रांगोळी पध्दतीने ४ ते ५ सें.मी. खोलीवर ही सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते दयावीत,को ८६०३२ ऊसासाठी २५% रासायनिक खतांची जादा मात्रा दयावी.

१.२.६ मध्यम प्रतिच्या जमिनीत ओल्या तर भारी व चोपण जमिनीत कोरड्या पध्दतीने लागण करावी.

१.२.७ ऊस लागणीनंतर ४-५ दिवसांनी वापशावर ५ किलो ॲट्राझीन (ॲट्राटाप) प्रति १०००लीटर पाण्यात विरघळून किंवा सेंकॅर (मेट्रीब्युझीन) १५०० ग्रॅम प्रति १०००लीटर पाण्यात मिसळून जमिनीवर फवारणी करावी.फवारणी करताना फवारलेली जमीन तुडवू नये.